N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार  **P.S.(ठाणे):** नवापूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0584  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/11/2023 21:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | १७० |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार  **Date From (दिनांक पासून):** 21/11/2023

**Time Period (कालावधी):** प्रहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 21/11/2023

**Time From (वेळेपासून):** 13:35 वाजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:43 वाजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 21/11/2023  **Time (वेळ):** 19:00 वाजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 018

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/11/2023 21:23 वाजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 00.10 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय,महसुल विभागाचे कक्षात

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सुशिल कांतीलाल पाऊणी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | भाटवड,नवापुर ,नवापूर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | भाटवड,नवापुर ,नवापूर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हनु रामा वळवी | | | 1. सोनारे शिवार,नवापुर ,नवापूर, नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार नाेंदवण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय रुपया | 3,000/ रुपये (तीन हजार रुपये) | 3,000.00 |
| 2 | इतर | मानवी अवयव/उत्पादने | एक पॅन्ट आरोपीच्या अंगावरील | 0.00 |
| 3 | इतर | मानवी अवयव/उत्पादने | एक शर्ट फिर्यादीच्या अंगावरील | 0.00 |



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 4 | इतर | घरगुती वस्तु | कपडाच्या दोन चाव्या | 0.00 |
| 5 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | दोन पेन ड्राईव्ह | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

3,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद नवापुर पोलीस स्टेशन, दि. 21/11/2023

मी, श्री. सुशील कांतीलाल पाडवी , वय-35 वर्षे, व्यवसाय- शेतमजुरी रा. गादवड, ता. नवापुर जि. नंदुरबार, मो. नं. 9359541379

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहून फिर्याद लिहून देतो की, मी वरील ठिकाणी आई इंदुबाई, वडील कांतीलाल पाडवी तसेच पत्नी मनिशा व एक मुलगी सान्या अपांसह राहतो. मी शेतमजुरी करून माझ्या कुटुंबाचा उदर निर्वाह करतो.

दि. 21/09/2023 रोजी मी व आमच्या गावातील ईतर 12 अश्या एकुण 13 लोकांविरुध्द विसरवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर 346/2023 भा.दं.वि. कलम 323, 143, 147, 149, 504, 506 वैगरे प्रमाणे गुन्हा दाखल आहे. आमच्या विरुध्द गुन्हा दाखल झाल्यानंतर विसरवाडी पोलीस स्टेशनच्या पोलीसांनी आमच्यावर प्रतिबंधक कारवाई करणेकामी दि. 02/11/2023 रोजी नवापुर तहसील कार्यालय येथे समक्ष घेऊन गेले होते. त्यावेळी नवापुर तहसिल कार्यालयातील फौजदारी शाखेत उपस्थित असलेले खाजगी इसम श्री. हनु वळवी हे मला तहसील कार्यालयाबाहेर भेटले व म्हणाले की " साहेबाला सांगुन तुमचे प्रतिबंधक कारवाईचे प्रकरण बंद करुन देतो , या कामासाठी प्रत्येकी 1000/- रु. प्रमाणे एकुण 13 जणांचे 13,000/- रु. द्यावे लागतील " असे सांगुन श्री. हनु वळवी यांनी माझ्याकडुन 13,000/- रु. मागितले होते. त्यावेळी मी हनु वळवी यांना सांगितले की, माझ्याकडे व माझ्यासोबतच्या ईतरांकडे आता एवढी रक्कम नाही. यानंतरही हनु वळवी यांनी माझ्याकडुन त्यावेळी 7,000/- रु. घेतले व मला सांगितले की, उर्वरीत रक्कम दिनांक 09/11/2023 रोजी आणुन द्या, नाहीतर साहेबांना सांगुन तुमची प्रतिबंधक कारवाईची कार्यवाही बंद होऊ देणार नाही व रोजची सर्वांच्या तारखा सुरु होतील.

यानंतर मला खात्री झाली की , खाजगी पंटर हनु वळवी हे माझ्याकडुन उर्वरीत पैश्यांची मागणी पुन्हा पुन्हा करतील. यानंतर मी हनु वळवी यांनी माझ्याकडुन 13,000/- रुपयांची मागणी केल्याबाबत व त्यापैकी 7,000/- रु. घेतल्याची तक्रार दि.09/11/2023 रोजी अँटी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथील माझ्या ओळखीचे पोलीस श्री. देवराम गावीत यांना दि.09/11/2023 रोजी फोनवर सांगितले व त्यांना खांडबारा येथे येण्याची विनंती केली. यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.राकेश चौधरी, पोलीस देवराम गावीत हे दिनांक 09/11/2023 रोजी स्टाफ सह व पंचांसह खांडबारा चौफुली येथे आले होते. खांडबारा चौफुली येथे लोकनियतोच्या दृष्टीने व पुढील कामकाज करण्यासारखी परिस्थीती नसल्याने , मी व माझा पुतण्या स्नेहांसह अँटी करप्शन ब्युरो नंदुरबार येथील अधिकारी, स्टाफ व पंच अश्यांच्या सर्वानुमते पुढील कामकाजकामी नवापुर विसरवाडी रोडवर असलेले हॉटेल आर्चिस येथे जाण्याचे ठरले होते. यानंतर आम्ही सर्वजण हॉटेल आर्चिस येथे हजर झालो , तेथे पंचांसमक्ष मी लेखी तक्रार दिल्यानंतर झालेल्या पडताळणी व सुचनांनुसार हनु वळवी , खाजगी पंटर नवापुर यांनी बोलावल्यानुसार दि. 09/11/2023 रोजी आर्चिस हॉटेल येथुन तहसिल कार्यालय, नवापुर येथे पंचांसमक्ष लाच मागणी पडताळणी कारवाई करण्यात आली. ज्यात हनु वळवी , खाजगी पंटर , तहसिल कार्यालय, नवापुर यांनी पंच क्रमांक 01 श्री. रवि पैसाणे, कनिष्ठ लिपीक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, नंदुरबार यांच्या समक्ष माझे व आमच्या गावातील ईतर 12 जण यांच्या विरुध्दचे प्रतिबंधक कारवाईचे प्रकरण बंद करुन देण्याच्या मोबदल्यात प्रथम प्रत्येक ईसमाचे 1000/- रुपये प्रमाणे 13 हजार रुपये घेण्याचे व तडजोडीअंती एकुण 10,000/- रुपयांची मागणी करुन



Scanned with CamScanner

घेण्याचे मान्य केले. एकुण 10,000/- रुपयांपैकी हनु वळवी यांनी माझ्याकडुन 7,000/-रुपये अगोदरच घेतले असल्याने उर्वरीत 3,000/-रुपये लाचेची रक्कम लवकर आणुन दे, असे म्हणुन स्पष्ट स्वरुपात लाचेची मागणी केली असल्याचे पंच◌ासमक्ष निष्पन्न झाले आहे. दिनांक 09/11/2023 रोजी या बाबतचा सविस्तर पडताळणी पंचनामा पंच◌ासमक्ष करण्यात आला आहे.

यानंतर खाजगी पंटर हनु वळवी यांनी दिवाळी सणाच्या तहसील कार्यालय नवापुर येथे सुट्या असल्याचे सांगितल्याने , अंदाजे दहा दिवसांनंतर सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याप्रमाणे दिनांक 20/11/2023 रोजी हनु वळवी यांना नवापुर येथुन मोबाईल फोनवर संपर्क साधला असता त्यांनी मला दिनांक 21/11/2023 रोजी दुपारी 11/00 वाजेनंतर तहसिल कार्यालय,नवापुर येथे येण्या बाबत सांगितले. त्यानुसार मी, पोलीस उप अधीक्षक श्री.चौधरी साहेब व पंच अश्यांच्या सर्वानुमते आज दिनांक 21/11/2023 रोजी हनु वळवी यास तहसिल कार्यालय, नवापुर येथे भेटुन सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. याबाबत दि. 20/11/2023 रोजी पंचासमक्ष सविस्तर सापळा स्थगीत पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानुसार मी, पोलीस उप अधीक्षक श्री.चौधरी साहेब व पंच क्रमांक 01 श्री.रवि बैसाणे व पंच क्रमांक 02 श्री. अनिल ठाकरे व सापळा पथकातील सर्व पोलीस अंमलदार असे सर्वजण नवापुर ते विसरवाडी रोडवरील हॉटेल अ◌पेक्स येथे◌ आलो. पोलीस उप अधीक्षक श्री. राकेश चौधरी साहेब यांनी सुचनांनुसार खाजगी पंटर हनु वळवी यांनी 3,000/-रु ची लाचेची मागणी केली असल्याने मागणी केल्या प्रमाणे त्यांना देण्यासाठी 3,000/-रुपये हजर करण्याबाबत पंच◌ासमक्ष सुचना दिल्या. यानंतर मी माझ्या येथे उत्पन्नातुन बचत केलेले 500/- रुपये दराच्या 06 चलनी नोटा असे एकुण 3,000/-रुपये पोलीस उप अधीक्षक श्री. राकेश चौधरी साहेब व पंच नं 1 श्री.रवि बैसाणे यांचे समक्ष हजर केले. या ठिकाणी पोलीस उपअधीक्षक श्री. राकेश चौधरी यांच्या सुचनेवरुन पोना/देवराम गावीत यांनी लाचेच्या सापळ्यात अ◌न्थ्रासिन पावडर कशी लावली जाते याबाबत व अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात अ◌न्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबतचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. तसेच पोलीस उपअधीक्षक श्री.चौधरी यांच्या सुचनेवरुन पोना/अमोल मराठे यांनी एक सोनी कंपनीचा एक डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व सॅनडिस्क कंपनीचे मायक्रो एस.डी.-32 जी.बी.चे एक नवीन सीलबंद मेमरी कार्ड असे बाहेर काढून माझे व दोन्ही पंच यांचे समक्ष हजर केले. सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर कसे हाताळण्यात येते याची सविस्तर माहिती मला व दोन्ही पंचांना दिली. त्यासोबतच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर हाताळणीचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री. चौधरी यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालवून त्यामध्ये पूर्वीचे कसलेही रेकॉर्डींग नसल्याची पंचांची खात्री केली. याबाबत दि. 21/11/2023 रोजी पंचासमक्ष सविस्तर सापळापुर्व पंचनामा करण्यात आला आहे.

यानंतर हनु वळवी यांनी बोलावल्यानुसार तहसिल कार्यालय,नवापुर येथील मुख्य प्रवेशद्वाराजवळ पंच क्रमांक 01 श्री.रवि बैसाणे यांच्या सह गेलो असता तहसिल कार्यालय नवापुर येथील पहील्या मजल्यावरील महसुल विभागाच्या कक्षात हनु वळवी हे हजर होते. आम्ही त्यांच्या जवळ गेलो तेव्हा हनु वळवी यांनी मला आणले का ? असे विचारले तेव्हा मी त्यांच्या समोर माझ्या पर्टाच्या खिशातील लाचेची रक्कम धरली असता, खाजगी पंटर हनु वळवी यांनी सदर लाचेची रक्कम 3000/-रुपये त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी पुर्वनियोजीत ठरलेला ईशारा केला असता, सापळा पार्टी मधिल अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री. राकेश चौधरी, स्टाफ व पंच न ◌2 श्री.ठाकरे हे सक्रीय होऊन तात्काळ सदर ठिकाणी आले. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री. राकेश चौधरी यांनी हनु वळवी याने स्विकारलेली लाचेची रक्कम कोठे ठेवली ? याबाबत मला विचारले असता, मी सदर लाचेची रक्कम खाजगी पंटर हनु वळवी यांना दिले नंतर त्यांनी त्यांचे पॅन्टचे पुढील उजव्या बाजुच्या खिशात ठेवली असल्याचे सं◌ागितले. तेव्हा पंच नं 1 श्री.बैसाणे यांना सदर रकमे बाबत खात्री करण्यासाठी पोलीस पोलीस उप अधीक्षक श्री. राकेश चौधरी यांनी सांगितले असता खाजगी पंटर हनु वळवी यांच्या उजव्या बाजुच्या खिशात लाचेची रक्कम 3,000/-रुपये त्यात 500 रु दराच्या 06 चलनी नोटा मिळुन आल्यात. त्या नोटांची पंच नं 2 श्री. अनिल ठाकरे यांच्या मार्फत खात्री केली असता, सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे नंबर व हस्तगत करण्यात आलेली रक्कम ही तंतोतंत जुळुन आली. या बाबत दि. 21/11/2023 रोजी सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा पंच◌ासमक्ष केला आहे.

तरी तहसिल कार्यालय, नवापूर येथील खाजगी ईसम हनु रामा वळवी यांनी ते स्वतः तहसिल कार्यालय, नवापूर येथे फौजदारी लिपीक असल्याचे भासवून साहेबांकडुन माझे व माझ्या गावातील ईतर 12 नातेवाईक अश्या 13 जणां विरुध्द दाखल गुन्ह्यातील प्रतिबंधक कारवाईचे प्रकरण बंद करुन देण्यासाठी प्रत्येकी 1000/- रु. प्रमाणे 13 जणांचे एकुण 13,000/- रुपयांची प्रथमतः मागणी करुन, तडजोडीअंती माझ्या कडुन 10,000/- रु. घेण्याचे मान्य करुन मागणी केली. यापैकी 7,000/- रुपये अगोदरच माझ्याकडुन घेतले असल्याने उर्वरीत 3,000/-



Scanned with CamScanner

रुपयांची लाचेची मागणी केली. तसेच मागणी केलेली लाचेची रक्कम 3,000/- रुपये आज दिनांक 21/11/2023 रोजी 13/35 ते 13/43 वाजेचे दरम्यान तहसिल कार्यालय नवापुर येथील महसुल कक्षात पंचांसमक्ष स्विकारली आहे. म्हणुन माझी हनु रामा वळवी, व्यवसाय-खाजगी पंटर रा. सोनारे दिगर ता.नवापुर जिल्हा नंदुरबार यांच्या विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहीली असता , माझ्या सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

हि फिर्याद लिहुन दिली
दि. 21/11/2023

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमुद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Dnyaneshwar Laxman Ware(I (Inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (जो क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठविल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

नवापुर पोलीस स्टेशन



Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

Name (नाव): Dnyaneshwar Laxmi

Rank (हुद्दा): Inspector

No. (क्र.):

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरेतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीख/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(से.मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | वेळक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोशाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner